सन्माननीय अमिताभ कांत सर, माननीय कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मराठवाडा मित्र मंडळ महाविद्यालय आणि जी एम जी सी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकांसाठी आयोजित या बौद्धिक संपदा अधिकार कार्यशाळेला सर्व प्रथम मी हार्दिक शुभेच्छा देतो, अमिताभ कांत सरांनी नुकत्याच एका लेखांमधून बौद्धिक संपदा हाच करुणा नंतरचा प्रगतीचा महामार्ग असणार आहे असे नमूद केले आहे. संयोजकांनी बौद्धिक संपदा अधिकार यासारख्या राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचा विषय वेबिनार साठी निवडला याचा मला अत्यंत आनंद आहे आणि मी संयोजकांचे यासाठी कौतुक करतो,

महाराष्ट्र ही बुद्धिजीवी माणसांची भूमी आहे मग राष्ट्रपिता महात्मा गांधींचे गुरू गोपाळकृष्ण गोखले असो वा स्वराज्याचा मंत्र राष्ट्राला देणारे लोकमान्य टिळक असो अथवा स्वातंत्र्यवीर सावरकर असो या महाराष्ट्रातील बुद्धिवंतांनी देशासाठी मोठे योगदान केले आहे. पु ल देशपांडे यांनी लिहलेली पुस्तके आजही त्यांच्या नावे कॉपीराईट या बौद्धिक संपदेतून अधिकारित आहेत. ज्ञानेश्वरीची रचना ही संत ज्ञानरायाचीच बौद्धिक संपदा अधिकार आहे, कोणीही ती स्वतःच्या नावावर कधीही करू शकत नाही, त्याचबरोबर ब्रिटिशांच्या काळात सर्वाधिक पेटेंट घेणारा भारतीय हा महाराष्ट्रातूनच होता, आजही पेटंट आणि शेती जीआय या बौद्धिक संपदा मध्ये महाराष्ट्र क्रमांक एक वरच आहे. परंतु सदर पेटेंट दाखल करणाऱ्या कंपन्या या मोठ्या प्रमाणात परकीय आहेत. या परिस्थितीचे महत्त्वाचे कारण म्हणजे भारतातील शिक्षण व्यवस्थेमध्ये आजही पेटेंट किंवा कॉपीराइट सारख्या बौद्धिक संपदेच्या शिक्षणाचा अभाव आहे, अमेरिकेत आणि युरोपमधील विद्यापीठे करोडो रुपये पेटंटच्या लायसन्स मधून कमवतात व अनेक गरजू आणि हुशार मुलांना शिष्यवृत्ती देतात शिवाय त्यातून मिळालेल्या धनसंचय आतून स्वयंचलित यंत्रणा विद्यापीठासाठी तयार करतात. तत्सम यंत्रणा महाराष्ट्रातून निर्माण व्हावी बुद्धिजीवी जन्माला देणाऱ्या राज्याने बौद्धिक संपत्तीच्या माध्यमातून आणि विशेष करून शैक्षणिक क्षेत्रात त्याला स्थान देऊन राष्ट्रासाठी पुन्हा एकदा योगदान द्यावे अशी माझी तीव्र इच्छा आहे.

मला विशेष आनंद वाटला की शेती जी आय ला महाराष्ट्राला गेले अनेक वर्षांपासून क्रमांक एक वर ठेवणाऱ्या प्राध्यापक गणेश हिंगमिरे यांच्या संस्थेबरोबर पुणे विद्यापीठ आणि मराठवाडा मित्र मंडळ महाविद्यालय यांनीही बौद्धिक संपदा अधिकार कार्यशाळा करणाच अडचणीच्या काळातही घेतली. माझ्या वैयक्तिक आणि महाराष्ट्र शासनाच्या वतीने या स्तुत्य उपक्रमास पुन्हा एकदा शुभेच्छा देतो. अमिताभ कांत सरांनी आमच्या या शैक्षणिक संकल्पाला पाठिंबा दिला त्याबद्दल महाराष्ट्राच्या वतीने त्यांचे मनापासून आभार मानतो.

जय हिंद! जय महाराष्ट्र!